सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

# मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी

मदत

प्रशिक्षणातून परिवर्तन

## निविदा क्र. ०७/२०२५

## वैद्यकीय सुविधा पुरविणे कामी दरपत्रक मागविणे बाबत.

संस्थेचा संपर्क तपशील
www.madta.org.in
prabhodini31paithan@gmail.com
02431 350605
+91 9421329819 / +91 9420798700

पत्ता - नाथनगर (उत्तर) पैठण, ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर - ४३११४८

सहायक लेखाधिकारी

निबंधक

संचालक

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
(सामान्य प्रशासन विभाग)
**मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी**
**नाथनगर (उत्तर), पैठण जि. छत्रपती संभाजीनगर**
(विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर विभाग)
मदत प्रशिक्षणातून परिवर्तन
www.madta.org.in | prabhodini31paithan@gmail.com | 02431350605


**निविदा क्र. ०७/२०२५** **दिनांक : २६/०८/२०२५**

## विषय :- वैद्यकीय सुविधा पुरविणे कामी दरपत्रक मागविणे बाबत.

### दरपत्रक सूचना

मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण जि. छत्रपती संभाजीनगर ही संस्था सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिनस्त स्वायत्त प्रशिक्षण संस्था असून छत्रपती संभाजीनगर विभागाची विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था आहे. या संस्थेत शासन सेवेतील गट ब आणि गट क संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी यांना निवासी प्रशासकीय प्रशिक्षण दिले जाते. निवासी प्रशिक्षणार्थी यांना आपातकालीन परिस्थितीमध्ये वैद्यकीय सुविधा पुरविणे आवश्यक असून त्याकरिता इच्छुक नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाकडून **(Register Medical Practitioner)** खालील अटी व शर्तीस अधीन राहून स्पर्धात्मक पध्दतीने दरपत्रके मागविण्यात येत आहे.

**२) वेळापत्रक :-**

| अ.क्र | बाब | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | दरपत्रक दाखल करणे | २६/०८/२०२५ ते ०२/०९/२०२५ | कार्यालयीन वेळेमध्ये |
| २ | दरपत्रक लिफाफा उघडणे | ०३/०९/२०२५ | दुपारी ०२.०० वाजता (सहभागी सेवापुरवठादार उपस्थित असो किंवा नसो) |

**३) दरपत्रक सादर करण्याची पध्दत :-**

१. दरपत्रक मोहोरबंद असणे आवश्यक राहील.
२. दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यात विहीत मुदतीत दरपत्रक सादर करावे.
३. विहीत मूदतीनंतर प्राप्त दरपत्रक लिफाफायांचा विचार केला जाणार नाही.
४. लिफाफयांमध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रे व BOQ मध्ये दर सादर करणे बंधनकारक राहील.
   १. आधारकार्ड / पॅनकार्ड / पासपोर्ट / मतदार ओळखपत्र इ. पैकी कोणतेही एक ओळखपत्र.
   २. वैद्यकीय सेवेचे नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र

| Sr.no | Particular (A) | Rate By Register Medical Practitioner (MBBS) (Without GST) (B) |
|---|---|---|
| १. | Visit / Medical check up of Trainees / Consultation in Madta Paithan every day for one Hour | |
| २. | Visit / Medical check up of Trainees / Consultation in Madta Paithan "On Call Basis" in Emergency (Rate per Visit) | |
| | Total | |

सहाय्यक लेखाधिकारी          निबंधक          संचालक

Scanned with OKEN Scanner

४) **दरपत्रकाच्या अटी व शर्ती :-**

१. स्तंभ (B) मध्ये नमूद करण्यात येणारे दर हे GST वगळून सादर करण्यात यावे.
२. इच्छुक दरपत्रकधारक यांनी या कार्यालयाच्या कामाच्या ठिकाणाची प्रत्यक्ष पाहणी करावी आणि त्यानंतर दरपत्रके सादर करावीत. कार्यालयात प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणाची पाहणीसाठी शासकीय सुट्टी वगळता इतर कार्यालयीन दिवसांमध्ये सकाळी १०.३० ते ०६.०० या वेळेत येता येईल.
३. स्तंभ (B) मध्ये नमुद केलेले दराव्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम सेवापुरवठाधारकांस देय असणार नाही.
४. उपरोक्त दर नमूद करतांना निविदेतील सर्व अटी व शर्ती अवलोकन/वाचूनच दर नमूद करावे.
५. दरपत्रकामध्ये कामकाजाबाबतचा सर्व तपशील अचुक नमूद करणे आवश्यक आहे.
६. कोणतेही दरपत्रक/निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर नाकारण्याचा व रद्द करण्याचा अधिकार या संस्थेने राखून ठेवला आहे.
७. निविदा प्रक्रिया राबवितांना सहभागी निविदाधारकाचे एकसमान दर आल्यास सदर प्रकरणी वाटाघाटी करुन निविदा अंतिम करण्याचा अधिकार संस्थेने राखून ठेवला आहे.
८. या अटी शर्तीमध्ये नवीन अटी व शर्तीचा समावेश करणे, अटी व शर्ती कमी करणे तसेच परिस्थितीनुसार त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार संस्थेने राखून ठेवले आहे.
९. सदर कामासाठी लागणारा वाहतूक खर्च संबंधित पुरवठाधारक यांचेकडे राहील. त्याबाबत संस्थास्तरावरुन वेगळयाने कोणतेही अदायगी करण्यात येणार नाही.
१०. संस्थेने सूचना दिल्यानंतर तात्काळ वैद्यकीय सेवा पुरविणे आवश्यक राहील. तसेच वैद्यकीय सेवेच्या अनुषांगिक सर्व साहित्य संबंधित सेवापुरवठाधारकाचे राहील.
११. प्रशिक्षण संस्थेच्या सुनिश्चितीनंतर सेवेचे देयक अदा करण्यात येईल.
१२. संस्थेत द्यावयाची एक तास सेवा ही केवळ प्रशिक्षण सत्र चालू आहे त्या दिवशीच घेतली जाईल व त्याप्रमाणे देयक अदा करण्यात येईल.
१३. संस्थेतील प्रशिक्षण कार्यक्रम आगाऊ अवगत करण्यात येईल.
१४. तातडीची भेट सेवा घेतांना डॉक्टरांना / सेवापुरवठादारांना दुरध्वनीवरुन संपर्क केल्यास तशी VISIT SERVICE उपलब्ध करुन द्यावी लागेल.
१५. सेवापुरवठादाराची शैक्षणिक अर्हता M.B.B.S असणे आवश्यक राहील व त्यांचे सक्षम संस्थेचे कायदेशीर नोंदणी असणे बंधनकारक राहील.

५) **निवड प्रक्रिया :-**

१. **निविदा न्युनतम दर ठरविण्यासाठी BOQ मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे स्तंभ (B) मध्ये एकुण रकान्यामध्ये दर्शविलेल्या रकानामध्ये येणारी दरांची एकुण बेरीज करुन न्युनतम दर (L१) निश्चिती करण्यात येईल.**
२. दरपत्रकधारकांना काही तक्रार असल्यास मा. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे तक्रार करता येईल. मात्र या प्रकरणी मा. विभागीय आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल.

६) **प्रसिध्दीस्तव -**

१. संस्थेचे संकेतस्थळ www.madta.org.in
२. संस्थेचे सूचनाफलक (Notice Board)

सहाय्यक लेखाधिकारी

निबंधक

संचालक

Scanned with OKEN Scanner